


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २२७ वा सोमवार दि ०३ नोव्हेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# न्याय देणारेच अन्यायाचे भागीदार? मंत्री शिरसाट यांच्या OSD मुळे बुलढाण्यात खळबळ! ४.५ कोटींचा जमीन घोटाळा!

## OSD सिद्धार्थ भंडारे यांचे नाव अग्रस्थानी; भ्रष्ट मंडळअधिकारी विजय टेकाळे यांच्या आशीर्वादाने ४.५ कोटींचा जमीन व्यवहार?

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा पुन्हा एकदा राजकीय वादळाच्या केंद्रस्थानी आले आहे. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचे ओएसडी सिद्धार्थ भंडारे यांच्यावर तब्बल ४.५ कोटी किंमतीची १४ एकर शेती बेकायदेशीररीत्या हडपल्याचा धक्कादायक आरोप पुढे आला आहे. बुलढाण्यातील तारे कुटुंबाने पत्रकार परिषद घेऊन हे गंभीर आरोप केले असून या प्रकरणाने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. राहुल तारे यांच्या नावावरची २८ एकर वडिलोपार्जित सामायिक शेती डोंगरखंडाळा येथे असून तिचे २३ पेक्षा अधिक वारसदार आहेत. मात्र त्यातील केवळ आठ वारसदारांनी गुपचूप १४ एकर शेती साडेचार कोटी रुपयांना छत्रपती संभाजीनगर येथील महेंद्र राऊत यांना विकल्याचा आरोप करण्यात आला. धक्कादायक बाब म्हणजे हा महेंद्र राऊत हे ओएसडी सिद्धार्थ भंडारे यांचे मावस भाऊ असल्याचा दावा करण्यात आला आहे. व्यवहार करताना उर्वरित वारसदारांची संमती न घेता, दुय्यम निबंधक यांच्या मदतीने हा व्यवहार पार पाडल्याचा आरोप तारे कुटुंबाने केला आहे. तसेच तत्कालीन भ्रष्ट मंडळ अधिकारी विजय टेकाळे यांनी हरकती असूनही या जमिनीची नोंद महेंद्र राऊत यांच्या नावावर केल्याचे आरोप आहेत. संपूर्ण कारवाई ही सिद्धार्थ भंडारे यांच्या दबावाखाली झाल्याचा आरोप करत तारे कुटुंबाने संबंधित



अधिकाऱ्यांचे कॉल डिटेल्स तपासण्याची मागणी केली आहे. आजच मंत्री संजय शिरसाट बुलढाण्यात येत असल्याने या प्रकरणाचा तिखटपणा वाढला आहे. न्याय देणारे मंत्रीच आहेत तर त्यांनी प्रथम त्यांच्या OSD सिद्धार्थ भंडारे यांना पदमुक्त करून निष्पक्ष चौकशी करावी,फक्त अशी भावनिक मागणी तारे परिवाराने केली आहे. या प्रकरणामुळे संतापाची लाट उसळली असून सर्वांचे लक्ष आता मंत्री शिरसाट यांच्या भूमिकेकडे लागले आहे

---

# बनावट नोटांचे रॅकेट फोडले! बुलढाण्यातील युवक धुळे पोलिसांच्या तावडीत;५०० व १०० च्या नकली नोटा जप्त! बुलढाण्यातून बनावट पैसा राज्यभर पसरतोय का?

**जनसंचलन/बुलडाणा**

धुळे-सोलापूर महामार्गावर चांदे फाटा येथे धुळे पोलिसांनी धडक कारवाई करत बनावट चलनी नोटांची तस्करी करणाऱ्या बुलढाणा येथील तरुणाला जेरबंद केले आहे. या कारवाईमुळे जिल्हाभरात खळबळ उडाली असून, बनावट नोटांच्या मोठ्या रॅकेटचा माग काढण्यास पोलिसांना सुरुवात झाली आहे. धुळे तालुका पोलीस निरीक्षक धनंजय पाटील यांना गुप्त माहिती मिळताच, पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी संजय बाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. चांदे फाटा परिसरातील सूर्यपुत्र हॉटेलजवळ सापळा रचून संशयित तरुणाला थेट जेरबंद करण्यात आले. अटक केलेल्या आरोपीचे नाव मोहम्मद जफर मोहम्मद कुद्दुस (रा. टिपू सुलतान चौक, इकबाल नगर, बुलढाणा) असे असून, त्याच्या अंगझडतीतून ५०० रुपयांच्या ४४ आणि १०० रुपयांच्या २ बनावट नोटा, असा एकूण २२,२०० रुपयांचा बनावट मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी इशारा दिला आहे की, बनावट नोटा तयार करणारे आणि त्यांची तस्करी करणाऱ्यांना कोणतीही सूट दिली जाणार नाही. तर निरीक्षक पाटील यांनी सांगितले की, या कारवाईमुळे



बुलढाणा-सह संपूर्ण राज्यात पसरलेल्या बनावट चलनाच्या जाळ्याचा धागा हाती लागण्याची शक्यता आहे.

# आणि मी दवाखाना बंद केला!

## संपादकीय लेख

माझी इंटर्नशिप संपली आणि आता पुढं काय करायचं, हा प्रश्न निर्माण झाला. मानसोपचार या विषयात पदव्युत्तर शिक्षण घ्यावं असं मनात होतं. वैद्यकीय शिक्षणाच्या पाच वर्षांच्या काळात माझ्या एक लक्षात आलं होतं की आपल्याला शस्त्रक्रिया किंवा स्त्री रोग या विषयात नक्की पुढचं शिक्षण घ्यायचं नाही. आवडणारा विषय म्हणजे मनोव्यापार. त्याचा अभ्यास करायचा तर मनोविकृतीशास्त्र या विषयाचा डिप्लोमा करावा लागणार होता. माझ्या सुदैवाने आणि त्यावेळच्या नियमाप्रमाणं प्रथम क्रमांकाच्या विषयासाठी एक निवासी डॉक्टरची जागा आणि पदव्युत्तर शिक्षणाची जागा होती आणि ती मलाच मिळाली. अशा तऱ्हेनं बीजे वैद्यकीय महाविद्यालयाच्या आणि ससून हॉस्पिटलच्या मनोविकृतीशास्त्र या विभागात माझा प्रवेश झाला. बरोबरीने स्टायपेंडच्या रूपाने काही उत्पन्नही सुरू झालं. सहा महिने मनोविकृतीशास्त्र आणि सहा महिने मेडिसिन या विभागात आणि विषयामध्ये निवासी डॉक्टर म्हणून काम करायचं होतं. मनोविकृतीशास्त्राचे डॉक्टर शिरवैकर हे त्यावेळी येरवडा मनोरुग्णालयाचे अधीक्षक (आणि ससून हॉस्पिटलमध्ये मानद प्राध्यापक) होते. विषयाचं उत्तम ज्ञान आणि शिकवण्याची हातोटी यामुळे मनोव्यापाराकडे कसं बघायचं याचं उत्तम शिक्षण मला त्यांच्याकडून मिळालं आणि विषयाची बरोबर निवड केल्याचं समाधानही. त्या सहा महिन्यांमध्ये शिकलेल्या अनेक गोष्टी माझ्या पदवीपूर्व शिक्षणामध्ये नव्हत्या. विशेषत: मानवी भावनांबद्दल. डॉ शिरवैकर हा विषय उत्तम शिकवायचे आणि त्यामुळे खूप काही नवीन शिकण्याचा आनंद मला मिळाला. पुढचा सहा महिन्यांचा मेडिसिन या विषयातील कालावधी डॉक्टर सुळे यांच्या युनिटमध्ये गेला. ते मानद प्राध्यापक आणि डॉ. सुभाष काळे व डॉ. व्ही. आर. पै हे असिस्टंट ऑनररी प्रोफेसर होते. शिवाय डॉ. एच. व्ही. सरदेसाई यांच्या न्यूरोलॉजी क्लिनिकमध्ये त्या विषयातले शिक्षण घ्यायचे होते. ते सहा महिने खूप गडबडीत आणि कामात अतिशय आनंदात गेले. सुळे ज्या काळजीने रुग्ण तपासायचे आणि वेळ द्यायचे तसे डॉक्टर आता फार कमी. ते खासगी प्रॅक्टिसमध्ये एका दिवशी फक्त सहा रुग्ण तपासायचे. या डॉक्टरांकडून मला मानवतावादी दृष्टिकोन मिळाला. मला आठवतं अनेक वर्षांनंतर जोशी हॉस्पिटलमध्ये प्रभाकर पाध्ये हे सुभाष काळे यांचे रुग्ण मला भेटले. तोपर्यंत ङ्गसेकंड ओपिनियनफ घ्यायची पद्धत सुरू झाली होती. मी प्रभाकर पाध्यांना विचारलं की ङ्गसेकंड ओपिनियनफ घेणार का ? ते म्हणाले, ङ्गकशाला ? सुभाषवर माझा पूर्ण विश्वास आहे आणि तो करेल ते योग्यच असेल. चुकून काही विपरित झालं तर त्याचा त्यात काही दोष नसेल, ही खात्री मला आहे,फ डॉक्टर आणि रुग्णामधील हे विश्वासाचं नातं आता उरलेलं नाही, याचा मला फार खेद आहे. माझ्यावर चांगले संस्कार करणाऱ्या या सर्व डॉक्टरांचा मी अतिशय ऋणी आहे. युनिटमध्ये डॉ शैला कानिटकर या माझ्या रजिस्ट्रार होत्या आणि डॉ. अशोक चितळे हा दुसरा निवासी डॉक्टर. याच काळात ङ्गघाशीराम कोतवालफ या नाटकाच्या तालमी सुरू झाल्या आणि चालल्या जवळ जवळ तीन महिने. बुधवारी आमची ङ्गइमर्जन्सी ड्युटीफ असायची. तो वार सोडला तर बाकी सर्व दिवस मी रात्री साडेआठ ते अडीचपर्यंत नाटकाच्या तालमी करता बाहेर असे. निवासी डॉक्टर म्हणजे २४ तास सात दिवस काम. हॉस्पिटल सोडून जायचे तर दुसऱ्या डॉक्टरला माझे काम करायला लागायचे. मी तालमीला गेलो की, माझे हॉस्पिटलचे सर्व काम कानिटकर मॅडम आणि अशोक चितळे हे करायचे. तक्रार न करता. डॉ. सुळे आणि डॉ. काळे हे ङ्गघाशीराम कोतवालफ या नाटकाचे चाहते होते. ते एक वर्ष कसं निघून गेलं ते कळलंच नाही. पुढची दोन वर्षे निवासी डॉक्टरचे काम करण्याकरता मला रजिस्ट्रारपदी बढती मिळेल, असं वाटलं होतं कारण एक जागा रिक्त होती. परंतु, माझ्याच एका मैत्रिणीने मेडिसिनच्या ऐवजी मनोविकारशास्त्रामध्येच पुढचं शिक्षण घ्यायचं ठरवल्यामुळे आणि तिला माझ्यापेक्षा जास्त गुण असल्याने ती जागा तिला मिळाली आणि मी बेरोजगार झालो. निवासी डॉक्टर होतो; तोपर्यंत मला जवळजवळ बाबांच्या पगारा तकाच स्टायपेंड मिळत होता. ते उत्पन्न बंद झालं. वर्ष होतं १९७३ आणि नेमके त्याच वर्षी बाबा निवृत्त झाले. बाबा निवृत्त झाले म्हणून त्यांचा पगार नाही आणि इकडे माझी नोकरी गेली म्हणून माझाही पगार बंद. दोघांचंही उत्पन्न थांबलं. बाबांनी सगळी देणी फ ेडून उरलेले दहा हजार रुपये मला दिले. ते म्हणाले, ङ्गहे माझं उरलेलं सगळं तुझं आणि आम्हीही तुझेच.फ अरे बापरे, आता ? परिस्थितीचं पूर्ण आकलन व्हायच्या आधीच मी दवाखाना काढायचं ठरवलं. अरुण साळुंखे नावाच्या जवळच्या मित्राच्या भावाने उदारपणे त्याच्या कार्यालयातील एक खोली मला दवाखान्यासाठी दिली आणि मोठ्या थाटात सर्व दहा हजार रुपये खर्च करून मी दवाखाना थाटला. उद्घाटनाला ङ्गपीडीएफफ्चे संस्थापक भालबा केळकर आले होते. त्यांनी माझ्याकडून तपासून घेतलं आणि पाच रुपये दिले. ङ्गसर तुमच्याकडून पैसे घेणार नाही,फ असं मी म्हणालो तर त्यांची प्रतिक्रिया होती, ङ्गमी तुझा पहिला पेशंट आहे. पैसे घेफ मी निरुत्तर !






The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!



# खोटेपणा सिद्ध करणाऱ्यालाच जेल, शासनाचं मिळतंय संरक्षण, शरद पवारांचा एल्गार




**मुंबई :** आज महाविकास आघाडीतील घटक पक्ष आणि मनसेकडून मुंबईत मतचोरीविरोधात सत्याचा मोर्चा काढण्यात आला. या सत्याच्या मोर्चात विरोधी पक्षातील नेत्यांनी सहभाग घेतला. त्यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मतचोरीवरून शासनाला धारेवर धरले. शासनंच सगळ्यांना संरक्षण देत असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच आता मतचोरी थांबवण्याची जबाबदारी आपली आहे असे आवाहनही त्यांनी केले.शरद पवार म्हणाले की, काही ठिकाणी काही लोकांनी तक्रारी केल्या. काही ठिकाणी सांगण्यात आलं की इथे बनावट आधार कार्ड मिळते. सिद्ध करून द्या हे आव्हान आले. डेमो दाखवला आणि हा आरोप ज्याने केला त्याच्यावर गुन्हा दाखल केला. खोटारडे आहेत हे सांगण्याचा, सिद्ध करण्याचा जर प्रयत्न कोणी केला तर त्याच्यावर गुन्हे दाखल होतात. याचा अर्थ हे शासन सगळ्याला संरक्षण देते. त्यामुळे तुमची आणि माझी जबाबदारी आहे, काही करा पण मतदानाची चोरी आम्ही थांबवणार. आपण स्वत:साठी काही मागत नाही. आपण ऐवढंच म्हणतो की लोकशाहीमध्ये सविधानानं जो अधिकार तुम्हा आम्हाला दिला त्याचे जतन करा. त्याची आज वेळ आली आहे. आपण बघितलं निवडणुका झाल्या आणि त्या निवडणुकीमध्ये विशेषत: विधानसभेच्या निवडणुकीत जे प्रकार झाले. त्यामध्ये सामान्य माणसाचा संसदीय लोकशाही यावरचा विश्वासाला धक्का बसला. आज अनेक ठिकाणी लोक अस्वस्थ आहेत.याठिकाणी उत्तमराव जानकर सोलापूरचे आमदार आहेत. त्यांनी त्यांचा अनुभव तुमच्यासमोर सांगितला. त्यातून स्पष्ट होतं की सत्तेचा गैरवापर सातत्याने केला जातो. यांना तोंड द्यावे लागेल.

राजकीय मतभेद असू शकतात. निवडणुकीत संघर्ष असू शकतो. पण या सगळ्या गोष्टी विसरून आम्हाला एक व्हावं लागेल. आणि या देशाचा मतांचा अधिकार लोकशाहीचा हा अधिकार हा जतन करणं हेच आमचं कर्तव्य आहे. हा दृष्टिकोन ठेवून आपण या ठिकाणी निर्धार केला पाहिजे. देशाची लोकशाही टिकवायची असेल. मताचा अधिकार टिकवायचा असेल तर तुम्हाला आम्हाला एक व्हावं लागेल. मी तुम्हाला खात्री देतो. आज व्यासपीठावर असलेले सर्व नेते, सहकारी सगळ्यांच्या वतीने निर्णय घेतला काय पडेल ती किंमत मोजू पण ही चोरी थांबवू आणि या देशाची लोकशाही टिकेल कशी याची खबरदारी घेऊ.शरद पवार भाषणाच्या सुरूवातीला म्हणाले की, आजचा हा मोर्चा मला जुन्या गोष्टी आठवण करून देतो. महाविद्यालयात शिकत असताना संयुक्त महाराष्ट्रासाठी असे मोर्चे निघाले. काळा घोडा त्याचा परिसर तिथले मोर्चे हे एकप्रकारचा इतिहास निर्माण करणारे हे मोर्चे होते. तुम्ही सर्वांनी जी जबरदस्त एकजूट दाखवली. त्यातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीची आठवण झाली.

## पनवेलमध्ये मतदार यादीतील मतदाराचे नाव 'रर हह' तर पतीचे नाव 'कक दद'..




**पनवेल :** राज्यातील मतदार यादीतील घोळ समोर येत आता. आता पनवेल विधासभा मतदार क्षेत्रातील एक अजब प्रकार उघडकीस आला आहे. पनवेल विधानसभा मतदारसंघातील यादी भाग क्रमांक ३९० मतदार क्रमांक ३८८ एका महिला मतदाराचे नाव रर हह नमूद आहे. तर महिलेच्या पतीचे नाव कक दद असे आहे. या अजब नावाची चर्चा सर्वत्र होत आहे. तसेच आता यावर मनसेने आक्षेप घेतला आहे.मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना मतदार याद्या तपासण्यास सांगितल्या आहेत. यात दुबार आणि बोगस नावे स्थानिक निवडणूक अधिकारांच्या लक्षात आणून देऊन ती नावे मतदार यादीतून वगळावी, अशी विनंती करण्यास सांगितले आहे. मनसे कार्यकर्ते कामाला लागले असताना रोज मतदार यादीतील नवनवीन खुलासे समोर येत आहेत. नवी मुंबईतील बेलापूर मतदारसंघात काही ठिकाणी मतदारांचा पत्ता चक्क सार्वजनिक शौचालय आसल्याचे समोर आले आहे. तर काहींचा पत्ता नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांचं निवास दाखवण्यात आलं आहे.विशेष म्हणजे काही मतदार पाम बीच रस्त्यावर राहत असल्याचे मतदारयादीत नमूद आहे. तर एकाच मोबाईल नंबरवरुन जवळपास २८८ मतदारांची नोंद करण्यात आली आहे. यासारखे धक्कादायक खुलासे समोर येत असताना आता पनवेल विधासभा क्षेत्रातील एका मतदार यादीत एका महिला मतदाराचे नाव रर हह तर पतीचे नाव कक दद आहे नमूद असल्याचे समोर आले आहे. असे नाव असते का? याबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे. प्रकरणाची गंभीर दखल घेत पनवेल मनसे महानगर प्रमुख योगेश चिले यांनी निवडणूक आयोगाकडे याबाबत विचारणा केली आहे.

## शिंदेंच्या बालेकिल्ल्यात ठाकरेंचा झेंडा

**ठाणे :** विधानसभा निवडणुकीत पानीपत झाल्यानंतर ठाकरे ब्रँड धोक्यात आलेला आहे. त्यामुळे गेल्या चार महिन्यांपासून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या गाठीभेटी सातत्यानं सुरु आहेत. त्यांच्या बैठका वाढलेल्या आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ठाकरे बंधूंच्या पक्षांची युती होण्याची दाट शक्यता आहे. सध्या अनेक आंदोलनांमध्ये दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते आणि नेते एकत्र दिसत आहेत. एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात शिवसेना उबाठा आणि मनसेची जवळीक सर्वाधिक आहे.

एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला आणि त्यांचे खासदारपुत्र श्रीकांत शिंदे यांच्या मतदारसंघात ठाकरेंच्या शिवसेनेनं विजय मिळवला आहे. कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या खोणी ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी शिवसेना उबाठा पक्षाच्या ज्योती विश्वास जाधव यांची बिनविरोध निवड झाली आहे.

## प्रकाश आंबेडकरांची एक मागणी अनब उद्धव ठाकरे अडचणीत ; नोटीस आली



**मुंबई :** कोरेगाव भीमा हिंसाचार प्रकरणी चौकशी आयोगाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना नोटीस बजावली आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी केलेल्या मागणीनंतर आयोगाने ही कारवाई केली आहे. १ जानेवारी २०१८ रोजी झालेल्या हिंसाचारासाठी राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पुणे पोलीस व काही हिंदुत्ववादी संघटना जबाबदार असल्याचा दावा करत, संबंधित कागदपत्रे आयोगासमोर सादर करण्याची मागणी प्रकाश आंबेडकर यांच्याकडून करण्यात आली होती. या मागणीला उत्तर देण्यासाठी आयोगाने उद्धव ठाकरे यांना दोन वेळा नोटीस बजावली होती, परंतु त्यांनी प्रतिसाद न दिल्यामुळे आंबेडकर यांनी जामीनपात्र वॉरंट काढण्याची मागणी केली. यावर गंभीर दखल घेत आयोगाने उद्धव ठाकरे यांना २ डिसेंबर रोजी आयोगासमोर हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत.

ऑगस्टमध्ये ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी एक अर्ज केला होता. या अर्जात त्यांनी १ जानेवारी २०१८ रोजी कोरेगाव भीमा येथे झालेल्या हिंसाचारासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पुणे पोलीस व काही हिंदुत्ववादी संघटना जबाबदार असल्याचा दावा केला होता. या दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक कागदपत्रे आयोगासमोर सादर करण्याची मागणी त्यांनी केली होती. या अर्जाला उत्तर देण्यासाठी कोरेगाव भीमा चौकशी आयोगाकडून उद्धव ठाकरे यांना १२ सप्टेंबर आणि २७ ऑक्टोबर रोजी दोन वेळा नोटीस पाठवण्यात आली होती.

# मतचोरीबद्दलच्या पवारांच्या वक्तव्याला मंत्री शिरसाटांचं उत्तर ; म्हणाले, 'पन्नास वर्ष सत्ता भोगली तेव्हा...'

**नांदेड :** निवडणूक व्यवस्थेवर सत्तेचा गैरवापर होतं आहे, राजकीय मतभेद विसरून सर्वजण एकत्र यायला पाहिजे अस वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली आहे. आज ते मुंबईत पार पडलेल्या महाविकास आघाडीच्या सत्याचा मोर्चामध्ये बोलताना त्यांनी हे वक्तव्य केलं आहे. दरम्यान, शरद पवारांच्या याच वक्तव्याला आता महायुतीचे नेते व सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी प्रतित्यूत्तर दिले आहे.

सत्तेत येऊन आम्हाला काही दिवस झाले आहेत, ज्यांनी पन्नास वर्ष सत्ता भोगली, त्यांनी या गोष्टीचा विचार केला नाही. याच्यापूर्वी शरद पवार यांनी अनेक निवडणुका लढवल्या, सत्तेत येऊन आम्हाला किती वर्ष झाले? त्यांच हे वक्तव्य आश्चर्याची गोष्ट असल्याचं, मंत्री संजय शिरसाट म्हणाले. मंत्री शिरसाट हे आज नांदेड दौऱ्यावर आहेत, यावेळी त्यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे.सगळे जण जर दुबार मतदाराबाबत पुरावे देत असतील, तर निवडणूक आयोगाने याची गांभीर्याने दखल घेतली पाहिजे, निवडणूक घ्यायची की लांबवायची याबाबतही तातडीने निर्णय घ्यायला पाहिजे. लोकांचा आक्रोश असेल,



लोकांना वाटत असेल तर मतदार याद्यांची छाननी व्हायला पाहिजे, आमचा विरोध मोर्चालाही नाही, मागणीलाही नाही, निर्णय घेण्याचे अधिकार निवडणूक आयोगाला आहेत, असेही यावेळी शिरसाट म्हणाले आहेत.महाविकास आघाडी एकत्र दिसली, त्यांना शुभेच्छा. निवडणुकीत पाहू, अशी प्रतिक्रिया महाविकास आघाडीतील नेते एकत्र आल्याबाबत शिरसाठ यांनी दिली. मतचोरांना जरूर धडा शिकवावा, लोकसभेत ज्यांनी मतं चोरली त्यांनाही धडा शिकवा. आम्ही हाडाचे कार्यकर्ते आहोत, मतदारांच्या भरवश्यावर निवडणुका जिंकू, असेही यावेळी मंत्री संजय शिरसाट म्हणाले आहेत.'तुम्हा सर्वांनी आज जबरदस्त ताकद दाखवली आहे. लोकशाही, संविधानाने दिलेला अधिकार जतन करण्याची ही वेळ आहे. आजच्या एकजुटीने संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आठवली. संविधानाने लोकशाहीत जो अधिकार दिला आहे, त्याचं रक्षण करण्याची वेळ आली आहे, त्यामुळे येत्या काळात आपल्याला सगळं विसरुन एक व्हावं लागेल', असे आवाहन शरद पवारांनी केले. निवडणूक आयोगाने हे सर्व सिद्ध करुन देण्याचे आवाहन आम्हाला केले होते. ज्यांनी सिद्ध केले त्यांच्यावर गुन्हा दाखल केला का? असा सवालही शरद पवारांनी उपस्थित केलेला पाहायला मिळाले.

# १७ वर्षांच्या मुलीने प्रियकर-मित्रांसोबत आईचा जीव घेतला, मावशीला आला संशय

**बंगळुरु :** १७ वर्षीय अल्पवयीन मुलीने आपल्या मित्रांच्या मदतीने आपल्याच ३४ वर्षीय आईची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार बंगळुरुमध्ये समोर आला आहे. त्यानंतर हे प्रकरण आत्महत्या असल्याचं भासवण्यासाठी तिने आईला पंख्याला लटकवलं. दक्षिण बंगळुरुमधील उत्तरहल्ली येथील राहत्या घरातच लेकीने हा प्रकार केला. सुरुवातीला सर्वांनाच हे प्रकरण आत्महत्या वाटत होतं, पण मुलीने घरी परत आल्यानंतर आजीला वेगळीच कहाणी सांगण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे तिच्या मावशीला संशय आला आणि तिने पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी कसून चौकशी केली असता मुलीने अखेर गुन्हा कबूल केला.मृत महिलेचं नाव नेत्रावती होतं. ती उत्तरहल्लीमध्ये राहत होती. एका कर्ज वसुली करणाऱ्या कंपनीत टेलिकॉलर म्हणून काम करत होती. नेत्रावती तिच्या पतीपासून वेगळी राहत होती, तर मुलगी तिच्यासोबतच होती. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, या हत्येमध्ये मुलीसह तिचे चार अल्पवयीन मित्र सहभागी होते. या सर्वांचं वय १६ ते १७ वर्षांच्या दरम्यान आहे. यापैकी एक १३ वर्षांचा मुलगा सातवीत शिकतो, तर बाकीचे सर्व शाळा सोडून बाहेर पडलेले आहेत.'दक्षिण-पश्चिम विभागाच्या पोलीस उपायुक्त अनिता बी हडणवर यांनी सांगितलं की, मृत नेत्रावतीची मोठी बहीण अनिताने तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनंतर भारतीय न्याय संहिता च्या कलम १०३ (हत्येसाठी शिक्षा) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या हत्येमागे एक प्रेमप्रकरण कारणीभूत होतं. नेत्रावतीची १७ वर्षीय मुलगी दहावीत नापास झाली होती. ती एका १७ वर्षीय मुलाच्या प्रेमात होती. तो मुलाने नववीतच शाळा सोडली होती. विशेष म्हणजे, हा प्रियकर मुलगा आरोपी मुलीच्या मावशीच्या मुलाचा मित्र होता. त्यामुळे त्या प्रियकरासह सर्व मित्र मंडळी अनेकदा मावशीच्या घरी येत-जात असत. नुकतंच नेत्रावतीला आपल्या मुलीच्या प्रेमसंबंधांबद्दल समजलं होतं. ती मुलीला आणि तिच्या प्रियकराला खूप ओरडली होती. मुलाला आमच्या घरी किंवा मुलीला भेटायला येऊ नकोस, अशी ताकीदही दिली होती.२४ ऑक्टोबर रोजी मुलगी, तिचा प्रियकर आणि इतर मित्र एका मॉलमध्ये भेटले. तिथे मुलीने त्यांना घरी बोलावले. तिने सांगितलं की, संध्याकाळी तिची आई दारु पिऊन लवकर झोपी जाईल.



## ४ अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी एकाला निर्घृणपणे संपवलं ; नागपुरात खळबळ

**नागपूर :** कंपनीकडून नोकरीसाठी महाविद्यालयांमध्ये घेण्यात येणाऱ्या कॅम्पस प्लेसमेंट चाचणी परीक्षेतील कॉपीच्या चौघांनी वादातून अल्पवयीन साथीदाराच्या मदतीने नूर नवाज हुसेन (वय २१, रा. दुर्गानगर, पारडी) याची हत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. नूर हत्याकांडात पारडी पोलिसांनी अभियांत्रिकीच्या चार विद्यार्थ्यांना अटक करून त्यांच्या अल्पवयीन साथीदाराला ताब्यात घेतले.

पारडीच्या एचबी टाउन येथे शुक्रवारी रात्री ही घटना घडली होती. खिलेश्वर रामेश्वर बिसेन (वय १९, रा. श्यामनगर, पारडी नाका), अन्नू ऊर्फ अनस अहमद अब्दुल वकील (वय १९, रा. गंगाबाग, पारडी), प्रतीक ऊर्फ आदित्य राजू करंडेकर (वय १९, रा. साईनगर, कळमना) व प्रवीण मृत्युंजय पांडे (वय २०, रा. भवानीनगर, पारडी) अशी अटकेतील मारेकऱ्यांची नावे आहेत. नूर हा अंजुमन कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगमध्ये बीटेकच्या अंतिम वर्षाला शिकत होता. नूरचा मित्र हर्षल संजय रामटेके (वय २१, रा. पडोळेनगर, वाठोडा) हा जीएच रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनिअरिंगध्ये बीटेकच्या तृतीय वर्षाला तर बिसेन हा याच कॉलेजमध्ये हर्षलसोबत शिकतो. पांडेही अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असून, १७वर्षीय अल्पवयीन मुलगा बारावीत आहे. प्राप्त माहितीनुसार, अभियांत्रिकी महाविद्यालयात नोकरीसाठी विद्यार्थ्यांची चाचणी परीक्षा घेण्यात येते.

कंपन्यांचे पेपर सारखेच असतात. परीक्षेत बहुतांश विद्यार्थी कॉपी करून पेपर सोडवितात. याच पेपरच्या कॉपीवरून हर्षल व बिसेनचा अनेक दिवसांपासून वाद सुरू आहे. याबाबत हर्षलने नूरलाही सांगितले होते.शनिवारी पोलिसांनी बिसेन व त्याच्या साथीदारांना न्यायालयात हजर केले. न्यायालयाने चौघांची चार दिवस पोलिस कोठडीत रवानगी केली. बिसेन व हर्षलचा अनेक दिवसांपासून वाद सुरू आहे. या वादातूनच नूर हत्याकांड घडल्याचा दावा पोलिस करीत आहेत.

## पोलिसाच्याच घरी चोरी, शहरात खळबळ

**जालना :** ३१ ऑक्टोंबरला कदीम जालना पोलीस ठाण्यामध्ये एक फिर्याद दाखल झाली. ही फिर्याद म्हणजे चोरीची फिर्याद. यात विशेष बाब अशी की फिर्यादी हा स्वतः पोलीस कॉन्स्टेबल आहे. त्यांचे नाव राजेंद्र हेमंत कुमार ठाकूर असं आहे. जालना शहरातील समर्थ नगर शिवनेरी अपार्टमेंट घाटी रोड जुना जालना येथे त्यांच्या राहत्या घरी चोरी झाली. अज्ञात चोरट्यांनी २५ आणि २६ ऑक्टोबरच्या रात्री १ वाजेच्या सुमारास चोरी केली. अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराच्या दरवाजाच्या कडीकोंडा तोडून घरात प्रवेश केला.

पोलीस कॉन्स्टेबल राजेंद्र ठाकूर हे त्यांच्या संपूर्ण कुटुंबासह इंदूर येथे त्यांच्या नातेवाईकांकडे गेले होते. याचाच फायदा घेत चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश केला. चोरट्यांनी घरात असलेल्या कपाटाच्या कडीकोंडा तोडून त्यात ठेवलेले १५ ग्राम वजनाची गळ्यातील सोन्याची पोत आणि ५ ग्राम वजनाची सोन्याची बदामी अंगठी, ६००० रुपये किमतीची सोन्याची अंगठी, सोन्याचे सिक्के आणि रोख २७ हजार रुपये असा लाखो रुपयांचा मुद्देमाल घेऊन चोरटे पसार झाले.ही बाब शेजारी राहणाऱ्या नागरिकांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ पोलीस कर्मचारी राजेंद्र ठाकूर यांना केला. त्यांनी फोनवर राजेंद्र यांना घरात झालेल्या चोरीची माहिती दिली. तुमच्या घरात चोरी झाली आहे, असे कळवले. यावेळी त्यांनी तात्काळ जालना शहर गाठले आणि पाहणी केली असता ते चकित झाले. कारण चक्क पोलिसाच्या घरात चोरी झाली. त्यामुळे हा विषय चर्चेला कारण ठरला आहे.राजेंद्र ठाकूर यांनी वेळ वाया न घालवता अज्ञात चोरट्यांविरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला. मात्री ही घटना सपूर्ण जालना शहराच चर्चेत आहे. आता चक्क पोलिसाच्या घरातच चोरी झाल्याने सर्वसामान्य नागरिकांचे काय? असा सवाल केला जातोय. या निमित्ताने पुन्हा एकदा जालना शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अवघ्या काही दिवसांपूर्वीच सर्वपक्षीय नेत्यांनी पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन जालना शहरातील कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवावी, भुरट्या चोरट्यांपासून शहरवासीयांची सुरक्षा करावी, अशी मागणी केली होती. पण आता पोलिसांनाच चॅलेंज करत या भुरट्या चोरट्यांनी चक्क पोलिसाच्या घरात चोरी केली. त्यामुळे पोलीस या चोरट्यांचा शोध घेणार का? असाच प्रश्न सध्या उपस्थित झाला आहे.



## गणेश काळेवर सहा गोळ्या झाडल्या, गेलाय की नाही? खात्री करण्यासाठी आरोपींकडून धक्कादायक कृत्य; पुणे हादरलं

**पुणे :** पुण्यात पुन्हा एकदा गँगवॉरमधून एकाची हत्या करण्यात आली आहे. कोंढवा भागात गणेश काळे या रिक्षाचालकाचा गोळीबार आणि कोयत्याने वार करुन त्याची हत्या करण्यात आली. या हत्येनंतर आरोपी फरार झाले. या हत्येचं कारण अद्याप स्पष्ट नाही. आंदेकर-कोमकर टोळीयुद्धातून ही हत्या झाल्याचं सांगण्यात येत आहे. हत्या झालेला गणेश काळे हा कोमकर टोळीचा सदस्य असलेल्या समीर काळेचा भाऊ आहे. समीर काळे हा वनराज आंदेकरच्या हत्येतील आरोपी असून तो सध्या तुरुंगात आहे. त्यामुळे ही हत्या गँगवॉरमधून झाल्याची चर्चा आहे.आंदेकर टोळीकडून आयुष कोमकरची हत्या करण्यात आल्यानंतर टोळी प्रमुख सुर्यकांत उर्फ बंडू आंदेकरसह अनेकांना अटक करण्यात आली होती. मात्र, तरीही आंदेकर टोळी सक्रिय असल्याचं या हत्येतून दिसून आलं आहे. वनराज आंदेकर हत्या प्रकरणात तुरुंगात असलेल्या समीर काळेचा हा गणेश काळे भाऊ आहे. त्यामुळे त्याच्या हत्येमागे गँगवॉर आहे का? याचा तपास पोलीस करत आहेत. गेल्यावर्षी वनराज आंदेकरची हत्या कोमकर गँगकडून करण्यात आली होती. त्यानंतर त्या हत्येचा बदला म्हणून आयुष कोमकरची हत्या करण्यात आली. या प्रकरणात आंदेकर गँगचा प्रमुख बंडू आंदेकर आणि त्याच्या अनेक साथीदारांना अटक करण्यात आली आहे. मात्र, तरी देखील ही हत्या होत असेल तर आंदेकर टोळी अजूनही सक्रिय आहे आणि ते पुणे पोलिसांसमोर मोठं आव्हान असेल.मिळालेल्या माहितीनुसार, गणेश काळेवर हल्लेखोरांनी सलग सहा गोळ्या झाडल्या. त्यानंतर खात्री करण्यासाठी त्याच्यावर कोयत्याने सपासप वार करण्यात आले. पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आलं आहे की, गणेशचा भाऊ समीर काळे हा वनराज आंदेकर खून प्रकरणात सहभागी होता. त्यानेच त्यावेळी हत्येसाठी लागणारी पिस्तुले मध्य प्रदेशातून आणली होती. त्यावेळी समीरसह आबा खोंड, आकाश म्हस्के आणि संगम वाघमारे या चौघांनी मिळून ९ पिस्तुले धुळेमार्गे मध्यप्रदेशातून आणल्याची माहिती तपासात समोर आली होती.





# भारताचा ऑस्ट्रेलियावर रोमांचक विजय, वॉशिंग्टन सुंदर-तिलक वर्माची झुंजार खेळी

**मेलबर्न :** भारताने मालिका १-१ अशी बरोबरीत आणली आहे, आता निर्णायक सामना बाकी आहे. भारतीय संघाने ऑस्ट्रेलियात आजपर्यंत एकही टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका गमावलेली नाही. पहिल्या सामन्यात मेलबर्नमध्ये भारतीय संघ पूर्णपणे निष्प्रभ ठरला होता, पण या सामन्यात सूर्यकुमार यादवने अखेरीस टॉस जिंकल्यापासून त्यांनी अनेक गोष्टी योग्य केल्या. अर्शदीप सिंगने ट्रॅव्हिस हेड आणि जॉश इंग्लिसला लवकर बाद करत ऑस्ट्रेलियाला सुरुवातीलाच धक्के दिले. टीम डेव्हिड तुफान फलंदाजी करत होता, पण त्याचवेळी वरुण चक्रवर्तीने एकाच षटकात दोन विकेट्स घेत ऑस्ट्रेलियन संघाचा वेग कमी केला. डेव्हिड बाद झाल्यानंतर मार्कस स्टोइनिसने सूत्रे हाती घेतली आणि या जोडीने शिवम दुबेला लक्ष्य करत मोठी धावसंख्या उभारण्याचा निर्धार पक्का केला. मात्र, शिवम दुबेने धोकादायक मार्कस स्टोइनिसला बाद केले. या विजयामुळे भारतीय संघाने ऑस्ट्रेलियातील टी-२० मालिकेतील आपला दबदबा कायम ठेवला आहे. आता तिसरा आणि निर्णायक सामना बाकी आहे.

मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द झाला होता. आज तिस-या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना कांगारू संघाने ६ बाद १८६ अशी धावसंख्या उभारली होती. प्रत्युत्तरात भारतीय संघाने ५ गडी गमावून हे आव्हान यशस्वीरित्या पूर्ण केले.




भारतीय संघाने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कांगारू संघासाठी टीम डेव्हिडने ७४ धावांची सर्वात मोठी खेळी केली. मार्कस स्टोइनिसच्या बॅटमधून ६४ धावा निघाल्या. भारतीय संघासाठी अर्शदीप सिंगने सर्वाधिक ३ बळी घेतले. लक्ष्याचा पाठलाग करताना वॉशिंग्टन सुंदरने नाबाद ४९ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्याला तिलक वर्मा (२९ धावा) आणि सूर्यकुमार यादव (२४ धावा) यांनी साथ दिली.

ऑस्ट्रेलियाकडून नाथन एलिसने ३ विकेट्स घेतल्या. डेव्हिडने केवळ ३८ चेंडूंमध्ये ७४ धावा केल्या, ज्यात ८ चौकार आणि ५ षटकारांचा समावेश होता. त्याचा स्ट्राइक रेट १९४.७४ राहिला. हे त्याच्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील ९ वे, तर भारताविरुद्धचे दुसरेच अर्धशतक होते, जे त्याने अवघ्या २३ चेंडूंमध्ये पूर्ण केले. तो आतापर्यंत ६६ सामन्यांतील ५७ डावांमध्ये ३७.४२ च्या सरासरीने आणि १६९.२१ च्या दमदार स्ट्राइक रेटने १,५७२ धावा करण्यात यशस्वी झाला आहे.

स्टोइनिसने ३९ चेंडूंचा सामना करत ६४ धावा काढल्या. यात ८ चौकार आणि २ षटकारांचा समावेश होता. त्याचा स्ट्राइक रेट १६४.१० होता. हे त्याच्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील ६ वे आणि भारताविरुद्धचे पहिले अर्धशतक होते, जे त्याने ३२ चेंडूंमध्ये पूर्ण केले. तो ८० सामन्यांतील ६५ डावांमध्ये ३२.२१ च्या सरासरीने आणि १४८.७६ च्या स्ट्राइक रेटने १,३२१ धावा करू शकला आहे. त्याची सर्वोत्तम धावसंख्या ७८ धावा आहे. अर्शदीप सिंगची शानदार गोलंदाजी : अर्शदीपने ४ षटके गोलंदाजी करत ३५ धावांच्या मोबदल्यात ३ महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या. त्याची इकॉनॉमी ८.८० होती. त्याने पहिल्याच षटकात ट्रॅव्हिस हेडला (६ धावा) बाद केले. त्यानंतर जोश इंग्लिसला (१ धाव) आपला बळी बनवले. स्टोइनिसच्या रूपात त्याने तिसरी विकेट घेतली. वरुण चक्रवर्तीने या सामन्यात २ बळी घेतले.

### अर्शदीपने कुलदीपच्या विक्रमाची केली बरोबरी

अर्शदीप सिंग हा भारतासाठी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक वेळा ३ किंवा त्याहून अधिक विकेट्स घेणारा संयुक्त खेळाडू बनला आहे. त्याने कुलदीप यादवच्या विक्रमाची बरोबरी केली आहे. या दोन्ही गोलंदाजांनी या फॉर्मेटमध्ये प्रत्येकी १४-१४ वेळा '३ विकेट्स हॉल' आपल्या नावावर केले आहेत. युजवेंद्र चहल आणि हार्दिक पंड्या (प्रत्येकी १० वेळा) संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर आहेत, तर भुवनेश्वर कुमार आणि रवी बिश्नोई यांनी ८-८ वेळा हा पराक्रम केला आहे.

## उन्नती हुडा उपांत्य फेरीत



**सारब्रुकेन (जर्मनी) :** येथे सुरू असलेल्या विश्व बॅडमिंटन फेडरेशनच्या हायलो खुल्या आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत महिला एकेरीत भारताच्या उन्नती हुडाने चीन तैपेईच्या लिनचा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश मिळविला. मात्र लक्ष्य सेन आणि आयुष शेट्टी यांचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले.

महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात ३४ व्या मानांकीत उन्नती हुडाने चीन तैपेईच्या चौथ्या मानांकीत लिनचा २२-२०, २१-१३ अशा सरळ गेम्समध्ये पराभव करत शेवटच्या चार खेळाडूंत स्थान मिळविले. हा सामना हुडाने ४७ मिनिटांत जिंकला. गेल्या मे महिन्यात झालेल्या मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत हुडाला लीनकडून पराभव पत्करावा लागला होता. या पराभवाची परतफेड उन्नतीने या स्पर्धेत केली. पुरूष एकेरीच्या सामन्यात फ्रान्सच्या चौथ्या मानांकीत ॲलेक्स लेनीरने भारताच्या लक्ष्य सेनचा २१-१७, १४-२१, २१-१५ अशा गेम्समध्ये पराभव केला. हा सामना ७५ मिनिटे चालला होता.

चालु वर्षीच्या बॅडमिंटन हंगामात लक्ष्य सेनचा लेनिरकडून हा दुसरा पराभव आहे. डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत लेनिरने लक्ष्य सेनचा उपांत्यपूर्व फेरीत पराभव केला होता. पुरूष एकेरीच्या दुसऱ्या एका सामन्यात फिनलँडच्या केली कोलजोनेन याने आयुष शेट्टीवर १९-२१, २१-१२, २२-२० अशा गेम्समध्ये मात करत पुढील फेरीत स्थान मिळविले. हा सामना ७० मिनिटे चालला होता. या स्पर्धेत भारताच्या किरण जॉर्जला उपांत्यपूर्व फेरीत इंडोनेशियाच्या जोनाटेन ख्रिस्टीकडून १६-२१, १०-२१ अशा सरळ गेम्समध्ये हार पत्करावी लागली.

## आशियाई युवा स्पर्धेत भारताला ४७ पदके

**बहरीन :** येथे सुरू असलेल्या आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत भारतीय स्पर्धकांनी दर्जेदार कामगिरी केली असून आतापर्यंत १३ सुवर्ण, १७ रौप्य आणि १७ कांस्य अशी ४७ पदकांची लयलुट केली आहे.

भारतीय स्पर्धकांनी या स्पर्धेत मुष्टीयुद्ध या क्रीडा प्रकारात ४ सुवर्ण, २ रौप्य आणि १ कांस्यपदक मिळविले. बिच रेसलिंग या क्रीडा प्रकारात भारताने ३ सुवर्ण आणि २ रौप्य पदके मिळविली. भारतीय पथकाची या स्पर्धेतील ही ऐतिहासिक कामगिरी म्हणावी लागेल. विशेषत: मुष्टीयुद्ध या क्रीडा प्रकारात भारताने सर्वाधिक पदके मिळविली आहेत. खुशी चंद (४६ किलो), अहना शर्मा (५० किलो), चंद्रिका पुजारी (५४ किलो), अनिष्का (८० किलो वरील) यांनी सुवर्णपदके मिळविली. खुशीने चीनच्या जीनझीयुचा




४-१ अशा गुणांनी तर अहना शर्माने कोरियाच्या हेयांगचा ४-१, चंद्रिका पुजारीने उझबेकच्या कुमरिनोसोचा तसेच अनिष्काने प्रतिस्पर्ध्याचा ५-० असा पराभव करत सुवर्णपदक मिळविले. ६६ किलो गटात हरनूर कौरने रौप्य पदक, एम. लेंचेनबा सिंगने रौप्यपदक तर अनंत देशमुखने कांस्यपदक घेतले. बिच रेसलिंग प्रकारात भारताच्या सानी फुलमाली आणि अंजली यांनी अनुक्रमे मुले आणि मुलींच्या ६० व ५५ किलो वजन गटात सुवर्णपदके तसेच अर्जुन रुहील, सुजय तानपूरे आणि रविंद्र यांनी रौप्य पदके मिळविली.

## रोहन बोप्पन्नाचा टेनिसला निरोप

**नवी दिल्ली :** भारताचा अव्वल आणि ज्येष्ठ टेनिसपटू रोहन बोप्पन्नाने आपल्या तब्बल २० वर्षांच्या टेनिस कारकिर्दीला निरोप दिला आहे. शनिवारी रोहन बोप्पन्नाने आंतरराष्ट्रीय टेनिस क्षेत्रातून निवृत्तीची अधिकृत घोषणा केली. आतापर्यंत भारताच्या चार टेनिसपटूंनी ग्रँडस्लॅम स्पर्धेतील अजिंक्यपदे मिळविली असून यामध्ये बोप्पन्नाचाही समावेश आहे. फ्रान्समध्ये सुरू असलेल्या एटीपी टूरवरील पॅरिस मास्टर्स टेनिस स्पर्धेत रोहन बोप्पन्ना सध्या सहभागी झाला असून तो पुरूष दुहेरीत बुबलीकसमवेत खेळत असताना त्याला पहिल्याच फेरीत पराभव पत्करावा लागला. या पराभवानंतर बोप्पन्नाने टेनिस क्षेत्रातून निवृत्तीचा निर्णय जाहीर केला.

रोहन बोप्पन्ना हा कर्नाटकातील कुर्गचा रहिवासी आहे. गेल्या वर्षी पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत बोप्पन्नाने आपला सहभाग दर्शविला होता. २०२३ साली बोप्पन्नाने डेव्हिस चषक स्पर्धेतून निवृत्तीची घोषणा केली होती.



# शाहरुखने वाढदिवशी चाहत्यांना खास ट्रीट, KING चा लूक समोर

**मुंबई :** आज शाहरुख खान त्याचा ६० वा वाढदिवस साजरा करत आहे. त्यामुळे त्याच्या चाहत्यांमध्ये सुद्धा आनंदाचे वातावरण पाहायला मिळते. काल रात्रीपासूनच त्याच्या घराबाहेर चाहत्यांनी गर्दी केली आहे. त्यामुळे पोलीस सुद्धा कडेकोट बंदोबस्त देत आहे. अशातच शाहरुख खानने त्याच्या चाहत्यांना बर्थडेचं खास गिफ्ट दिलं आहे.

शाहरुख खानच्या वाढदिवसानिमित्त, त्याच्या आगामी चित्रपट 'किंग' चा धमाकेदार लूक समोर आला आहे. दिग्दर्शक सिद्धार्थ आनंद यांनी रिलीज व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये शाहरुख पूर्णपणे वेगळ्या लूकमध्ये दिसत आहे. 'पठाण' नंतर हा सिद्धार्थ आनंदसोबतचा दुसरा दुसरा चित्रपट आहे.

शाहरुख खानने 'किंग' चा व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट केला आणि कॅप्शनमध्ये लिहिले, '१०० देशांमध्ये कुप्रसिद्ध, जगाने त्याला फक्त एकच नाव दिले आहे- किंग, आता शोची वेळ आली आहे. २०२६ मध्ये थिएटरमध्ये.' या व्हिडिओमध्ये, आपण तो माणूस पाहतो ज्याला सर्वजण किंग खान म्हणतात, आता तो त्याच नावाच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे, आणि तेही एका शक्तिशाली आणि दमदार रुपात. एक पात्र ज्याच्या नावाने केवळ भीतीच नाही तर दहशतही निर्माण होते जेव्हा तो म्हणतो, 'सौ देशों में बदनाम, दुनिया ने दिया सिर्फ एकही नाम किंग'. २ नोव्हेंबर हा दिवस जगभरात 'शाहरुख दिन' म्हणून साजरा केला जातो आणि यावर्षी तो आणखी खास आहे. शाहरुख खानच्या वाढदिवशी, दिग्दर्शक सिद्धार्थ आनंदने त्याच्या बहुप्रतिक्षित चित्रपट 'किंग' चा टायटल रिलीज व्हिडिओ शेअर केला आहे. हा चित्रपट २०२६ मध्ये प्रदर्शित होईल. या चित्रपटात शाहरुख खानची अशी बाजू दाखवण्यात येईल जी प्रेक्षकांनी यापूर्वी कधीही पाहिली नसेल.

चाहत्यांनी पाहिले की शाहरुख खानने किंगचे पत्त्याचे पान तोंडात धरले आहे. हे त्याच्या खऱ्या नावाप्रमाणे म्हणजेच किंग ऑफ हार्ट्स, पडद्यावर असो वा खऱ्या आयुष्यात, एक संकेतस्वरुपी आहे. त्याचा नवीन सिल्व्हर हेअर लूक, कानातले आणि स्टाईल यापूर्वी कधीही पाहिलेला नाही असा पूर्णपणे नवीन आणि वेगळा अंदाय या सिनेमात पाहायला मिळण्याची शक्यता आहे.




## फौजी चित्रपटात सुपरस्टार प्रभास

**मुंबई :** सुपरस्टार प्रभास याच्या नव्या चित्रपटाचे नाव आणि पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. हनु राघवपुडी यांच्याकडून दिग्दर्शित या चित्रपटाचे नाव फौजी आहे. याच्या पोस्टरवर जबरदस्त ॲक्शन ड्रामाची झलक आहे, तसेच भगवद्गीतेतील काही ओळींचा उल्लेख असून त्याचा अर्थ महाभारतातील कर्ण आणि पांडवाशी निगडित आहे. 'जो जन्मापासूनच योद्धा आहे, तो गुरुशिवाय एकटा आहे' असा याचा आशय आहे. आमच्या इतिहासाच्या लपलेल्या अध्यायांपैकी एका सैनिकाची सर्वात शूर कहाणी असे या पोस्टच्या कॅप्शनदाखल म्हटले गेले आहे. प्रभास आणि राघवपुडी यांचा हा चित्रपट स्वातंत्र्यपूर्वीच्या भारतातील कहाणी दर्शविणारा आहे. हा एक देशभक्तीने युक्त वॉरड्रामा असेल, ज्यात प्रभास चित्रपटाच्या नावानुरुप एका सैनिकाच्या भूमिकेत असेल. त्याची ही भूमिका स्वातंत्र्य आणि सन्मानासाठी लढणाऱ्या एका बटालियनचे नेतृत्व करणारी असेल. चित्रपट वीरता, बलिदान आणि योद्ध्यांच्या भावनेला मोठ्या पडद्यावर साकार करणार आहे. फौजी चित्रपटात इमानवी इस्माइल हे खलनायकाच्या भूमिकेत असतील. याचबरोबर अनुपम खेर, मिथुन चक्रवर्ती आणि जया प्रदा देखील यात दिसून येणार आहेत.



## अनोख्या विषयावर काम्याचा चित्रपट

**मुंबई :** डिजिफिल्मिंग आणि मिररो फिल्म्सने 'मी नो पॉज मी प्ले' या चित्रपटाचे पोस्टर शेअर केले आहे. मेनोपॉजवर आधारित हा भारताचा पहिला फिचर फिल्म ठरणार आहे. याचबरोबर सामाजिक जागरुकतेकरता एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. महिलांचे आरोग्य, भावनात्मक बदल आणि आत्मस्वीकृतीविषयी चर्चेला सामान्य स्वरुप देणे हा या चित्रपटामागील उद्देश आहे. लेखक आणि निर्माते मनोज कुमार शर्मा यांच्या पुस्तकावर आधारित चित्रपट 'मी नो पॉज मी प्ले' एक अशा विषयावर मौन सोडतो, जो बऱ्याचअंशी दुर्लक्षिण्यात आलेला आहे आणि जीवनाच्या या स्वाभाविक टप्प्यादरम्यान महिलांचे आरोग्य, भावना आणि ओळखीवर प्रकाश टाकतो. हा चित्रपट २८ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होईल. हा चित्रपट मेनोपॉजच्या अवघड काळातून जाणाऱ्या महिलांच्या प्रामाणिक अनुभवांना समोर आणण्यासोबत त्यांचे साहस, आत्मनिरीक्षण आणि आत्मशोधाची भावपूर्ण कहाणी मांडणार आहे. चित्रपटात काम्या पंजाबी मुख्य भुमिका साकारत आहे. तिच्यासोबत दीपशिखा नागपाल, मनोज कुमार शर्मा, सुधा चंद्रन, एमी मिसोब्बा आणि अमन वर्मा देखील महत्त्वाची भूमिका साकारत आहे. हे सर्व कलाकार नारीत्व आणि आत्मस्वीकृतीच्या यात्रेच्या विविध दृष्टीकोनांना पडद्यावर साकार करण्याचा प्रयत्न करणार आहेत.



## 'थामाच्या यशानंतर रश्मिकाची दीपिकासोबत होतेय तुलना

**मुंबई :** 'थामा' चित्रपटाचे दिग्दर्शक आदित्य सरपोतदार सध्या आयुष्मान खुराना आणि रश्मिका मंदाना यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाच्या यशाचा आनंद साजरा करत आहेत. दिवाळीला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाला प्रेक्षकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये आदित्य सरपोतदार यांनी कलाकारांच्या कामाच्या वेळेबद्दल भाष्य केलं आहे.

एका मुलाखतीमध्ये आदित्य सरपोतदार म्हणाले की, निश्चित कामाचे तास आवश्यक आहेत. कधीकधी असं गृहीत धरलं जातं की, प्रत्येकजण २४ तास काम करेल, ज्यामुळे शारीरिक आणि मानसिक थकवा येतो. दिग्दर्शकाच्या मते, शूटिंग दरम्यान १२ तासांची शिफ्ट योग्य आहे, परंतु त्यापेक्षा जास्त काम करणं योग्य नाही. त्यांनी असंही म्हटलं की, कधीकधी लोकांना शूटिंगदरम्यान घरी जाण्याची संधीही मिळत नाही आणि पूर्णपणे चूकीचं आहे. आदित्य सरपोतदार यांनी दीपिका पदुकोणच्या कामाच्या वेळेच्या निश्चित मागणीबद्दल बोलताना सांगितलं की, अशा विनंत्यांमागील कारण समजून घेणं महत्त्वाचं आहे. कलाकारांना कॅमेऱ्यासमोर एक विशिष्ट लूक ठेवावा लागतो, म्हणून तिच्या मागण्यांमागील विचारांचा विचार केला पाहिजे. आदित्य सरपोतदार म्हणाले, 'एक अभिनेता म्हणून, तुम्हाला कॅमेऱ्यासमोर एका विशिष्ट पद्धतीनं दिसावं लागतं. म्हणून, जेव्हा दीपिकाने ८ तासांच्या कामाच्या मर्यादेचा मुद्दा उपस्थित केला तेव्हा आपण त्यामागील कारण समजून घेतलं पाहिजे. कोणीही विनाकारण मागणी करत नाही, म्हणून हे समजून घेणं महत्त्वाचं आहे.' त्यांनी पुढे म्हटलं की, ही पूर्णपणे वैयक्तिक निवड आहे आणि त्यांच्या कलाकारांच्या आरामाची खात्री करणं ही दिग्दर्शकाची जबाबदारी आहे.



रश्मिका मंदानाबद्दल आदित्य म्हणाले, 'रश्मिका १२ तास काम करते, पण ती कधीही तक्रार करत नाही. कदाचित ती तिच्या करिअरच्या अशा टप्प्यावर आहे, जिथे ती हे करू शकते, पण हे सर्वांना लागू होत नाही. माझं असं मत आहे की, अभिनेते आणि दिग्दर्शक एकाच विचारसरणीचे असतील तरच त्यांनी एकत्र काम करावं.'

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# धर्मदाय आयुक्त कार्यालयातील विजय नरवाडे यांची लाचेच्या आरोपातून निर्दोष सुटका...

**जनसंचलन/बुलडाणा**

सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बुलडाणा येथे तत्कालीन कार्यरत असलेले अव्वल कारकून विजय पंढरी नरवाडे यांची न्यायालयाने लाचखोरीच्या प्रकरणातून निर्दोष मुक्तता केली आहे. विशेष न्यायालय बुलडाणाचे विशेष न्यायाधीश श्रीमती मंजुषा व्ही देशपांडे यांनी ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी हा महत्त्वपूर्ण निकाल सुनावला. सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बुलडाणा येथे सन २०१३ मध्ये कार्यरत असलेले अव्वल कारकून विजय पंढरी नरवाडे यांच्या विरोधात खामगाव येथील रहिवासी शेखर ओमप्रकाश शर्मा यांनी लाच लुचपत विभाग बुलढाणा यांच्याकडे तक्रार दिली होती. त्यांना आदर्श बहुउद्देशीय संस्था खामगाव या नावाने धर्मदाय आयुक्त कार्यालय बुलढाणा येथे संस्थेची नोंदणी करावयाची होती. या संस्थेची नोंदणी करून देण्यासाठी सदर कार्यालयात कार्यरत असलेले अव्वल कारकून विजय नरवाडे यांनी त्यांच्याकडे दोन हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली असे शर्मा यांनी तक्रारीत नमूद केले होते.लाच लुचपत प्रतिबंधक विभाग बुलढाणा यांनी २४जानेवारी २०१३ रोजी सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय बुलढाणा येथे सापळा रचून कारवाई केली असता अव्वल कारकून विजय पंढरी नरवाडे यांनी दोन हजार रुपयाचे लाचेची मागणी करून लाच स्वीकारल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. तपास अधिकारी - एस एल. मुंढे, डीवायएसपी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग बुलढाणा यांनी तपास पूर्ण केल्यानंतर तत्कालीन धर्मदाय आयुक्त मुंबई तथा मा. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री विश्वास जाधव यांनी खटला दाखल करण्यास मंजुरी प्रदान केली व सदर प्रकरण न्यायालयात सुरू झाले. याप्रकरणी सरकार पक्षा तर्फे फिर्यादी शेखर शर्मा , सापळा कारवाईतील पंच क्र. १ सतिष कोल्हे, सक्षम अधिकारी मा. निवृत्त न्यायमूर्ती व्ही. के. जाधव व तपास अधिकारी मुंढे यांची साक्ष नोंदवीली. आरोपी विजय नरवाडे यांच्यावतीने ॲड. शर्वरी सावजी - तुपकर यांनी न्यायालयात सक्षमपणे बाजू मांडली. आरोपीच्या वतीने युक्तिवाद करताना ॲड. शर्वरी सावजी - तुपकर यांनी न्यायालयाचे लक्षात आणून दिले की फिर्यादी शेखर शर्मा हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असून खुनाच्या दोन प्रकरणांचा त्यांचेवर आरोप आहे, कथित लाचेची रक्कम आरोपी नरवाडे जवळ सापडलेली नाही तर कपाटात सापडलेली आहे व तिथे ती रक्कम कोणालाही ठेवता येते, यावरून आरोपीने लाच स्वीकारली हे सिद्ध होत नाही. तसेच फिर्यादीच्या संस्था नोंदणीचा प्रस्ताव मंजूर करायचा किंवा नाही हे आरोपीच्या हातात नाही त्यामुळे यासाठी आरोपीने लाच मागणे व घेणेचा प्रश्नच उद्भवत नाही. शिवाय या प्रकरणाच्या तपासामध्ये खूप त्रुटी आहेत, सक्षम अधिकाऱ्यांनी विचार न करता मंजूरात प्रदान केलेली आहे त्यामुळे संशयाचा फायदा आरोपीस मिळावा असा प्रभावी युक्तीवाद ॲड. शर्वरी सावजी - तुपकर यांनी न्यायालयासमोर केला. फिर्यादीची गुन्हेगारी पार्श्वभूमी , साक्षीदारांच्या तोंडी पुराव्यातील तफावती, तपासातील व मंजुरी आदेशातील त्रुटी लक्षात घेऊन आरोपीची सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता केली. त्यामुळे एका आरोपीने केलेल्या लाचेच्या आरोपातून मुक्त होण्यास आरोपी विजय नरवाडेला तब्बल १२ वर्ष लागले.

# ३ नोव्हेंबरला जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी व अडचणींचे निरसन करण्यासाठी दि. ३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात आले आहे. तक्रारदारांना जिल्हास्तरीय लोकशाही दिनी स्वत: उपस्थित राहणे शक्य नसल्यास आपली तक्रार प्रभारी अधिकारी लोकशाही दिन सामान्य प्रशासन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांचे नावे रजिस्टर पोस्टाने पाठविण्यास हरकत नाही. तसेच तक्रारकर्त्यांनी आपल्या तक्रारी सर्व निकषांचे अवलोकन करुन परिपूर्ण स्वरुपातच जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे तारखे आधीपर्यंत कार्यालयास प्राप्त होतील अशा हिशेबाने रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. १.अर्ज विहीत नमुन्यात केलेला असावा. २. तक्रार / निवेदन वैयक्तीक स्वरुपाची असावी. ३. चारही स्तरांवरील लोकशाही दिनाकरीता अर्जदाराने अर्ज विहीत नमून्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठविणे आवश्यक राहील. ४. तालुका लोकशाही दिनानंतर १ माहिन्यांने जिल्हाधिकारी लोकशाही दिनात अर्ज करता येईल. जिल्हाधिकारी लोकशाही दिनानंतर दोन माहिन्यांनी विभागीय आयुक्त लोकशाही दिनात व विभागीय आयुक्त लोकशाही दिनानंतर दोन माहिन्यांनी मंत्रालय लोकशाही दिनात अर्ज सादर करता येईल. १.न्याय प्रविष्ट प्रकरणे २. राजस्व अपिल्स ३. सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी. ४. विहीत नमून्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज ५.अंतिम उत्तर दिलेले आहे / देण्यात येणार आहे अशा प्रकरणांत पून्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज ६. तक्रार / निवेदन वैयक्तीक स्वरुपाची नसेल तर ७. वरील प्रमाणे जे अर्ज लोकशाही दिनाकरीता स्विकृत करता येऊ शकत नाहीत असे अर्ज सामान्य तक्रार या स्वरुपात संबंधित विभागांकडे कारवाई कामी पाठविण्यात येणार आहे, अशी माहिती तहसिलदार संजिवनी मुपडे यांनी दिली आहे.

# गुरुनानक जयंती निमित्त शहरात काढण्यात आली महाप्रभात फेरी....



**जनसंचलन/बुलढाणा**

गुरुनानक यांची ५५६ वी जयंतीनिमित्त शहरात प्रभात फेरी काढण्यात आली. ५ नोव्हेंबर रोजी गुरुनानक जयंती आहे. आजच्या या महाप्रभात फेरी ज्यामध्ये पंजाबी आणि सिंधी समाजाने मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या फेरीमध्ये सहभागी लोकांनी भजन-कीर्तन केले आणि जो बोले सो निहाल सत श्री अकाल असे जयकार लावले. फेरी शहरातील गुरुनानक दरबार पासून संगम चौक जयस्तंभ चौक मार्केट लाईन कारंजा चौक या मार्गाने प्रभात फेरी काढण्यात आली. प्रभात फेरीचा समारोप गुरुद्वाऱ्यावर पारंपारिक कीर्तन आणि अरदास करून करण्यात आला. या प्रभात फेरीमुळे संपूर्ण शहर भक्तीच्या वातावरणात झुमले होते आणि गुरुनानक जयंतीच्या धार्मिक महत्वाचे स्मरण करण्यात आले.शहरातील पंजाबी आणि सिंधी समाजाच्या उत्साहाने आणि भक्तीभावाने हा कार्यक्रम यशस्वी झाला आणि गुरुनानक देव यांच्या शिकवणींचा प्रसार करण्याचा प्रयत्न रंगला. हे सर्व कार्यक्रम गुरु नानक जयंतीच्या आधीपासून सुरू असून जयंतीच्या दिवशी विशेष पूजा आणि लंगरचा कार्यक्रम देखील पार पडतो. सकाळच्या वातावरणात पंजाबी आणि सिंधी समाज बांधव, महिला, लहान मुले मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बुलढाणा विधानसभा मतदारसंघातील मतदार याद्यांतील गोंधळ व संशयास्पद मतदारांच्या नोंदींसंदर्भात मुंबई येथे आदित्यजी ठाकरे यांच्यासोबत जयश्रीताई शेळके यांची सविस्तर चर्चा !

**जनसंचलन/बुलढाणा**



बुलढाणा विधानसभा मतदारसंघात मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर असलेल्या बनावट नोंदी, एका मतदाराचे दुबार नावे, मोठ्या प्रमाणात मयत मतदारांची नावे, एकाच पत्त्यावर अनेक मतदारांची नोंद तसेच नियोजनबद्ध पद्धतीने मोठ्या प्रमाणावर केलेल्या मतचोरीच्या तक्रारींचा तपशील युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे यांच्यासमोर मांडण्यात आला. यावेळी शिवसेना ॲड. जयश्रीताई शेळके यांनी बुलढाणा मतदारसंघातील सद्यस्थितीबाबत आदित्यजी ठाकरे यांना सविस्तर माहिती देऊन मतदार याद्यांतील विसंगती, बोगस नावे आणि दुबार नोंदींमुळे लोकशाही प्रक्रियेवर निर्माण झालेला संशय दूर करणं अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मतदान हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. त्यात फेरफार करण्याचा कुठलाही प्रयत्न लोकशाहीवर आघात आहे. त्यामुळे या गंभीर प्रकरणाची तात्काळ चौकशी करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे औपचारिक निवेदन देण्याचा निर्णय घेण्यात आला असून स्थानिक पातळीवरही जनआंदोलन तीव्र करण्यात येणार आहे. शिवसेना सदैव जनतेच्या न्यायासाठी कटिबद्ध आहे. बुलढाणा विधानसभा मतदारसंघातील मतदारांचा आवाज दडपण्याचा कुठलाही प्रयत्न सहन केला जाणार नाही, असा ठाम विश्वास यावेळी युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे यांनी० यक्त केला!

# नंबर प्लेटशिवाय गाड्या नगरपरिषदेचा स्वच्छतेपेक्षा निष्काळजीपणालाच प्राधान्य? चार महिने झाले तरी नंबर नाही!

# नगरपरिषद, ठेकेदार आणि आरटीओचा संगनमताचा खेळ?

**जनसंचलन/ नांदुरा**

नगरपरिषदेकडील स्वच्छता उपक्रमात गंभीर निष्काळजीपणाचा धक्का बसला आहे. चार ते पाच महिन्यांपूर्वी नगरपरिषदेत दाखल झालेल्या तब्बल १३ घंटागाड्या आठ छोटा हत्ती (फोर व्हीलर) आणि पाच थ्री व्हिलर ॲपे आजही शहरात विना नंबर प्लेट फिरताना दिसत आहेत. शहरातील प्रत्येक रस्त्यावर या गाड्या कचरा गोळा करतात, पण त्यांच्यावर वाहन ओळख क्रमांकच नाही! हा प्रकार नागरिकांच्या सुरक्षेला थेट धोका निर्माण करणारा आहे. जर एखाद्या दिवशी या गाड्यांनी चुकून अपघात घडवला, तर कोणती गाडी, कोणत्या चालकाने हा प्रकार केला हे शोधणे अशक्यप्राय ठरणार. नवीन गाड्यांना पासिंग आणि नंबर देण्याची कायदेशीर प्रक्रिया ७ ते ८ दिवसांत पूर्ण व्हावी लागते आणि स्टिकरची मुदत जास्तीत जास्त एका महिन्याची असते. मग चार-पाच महिन्यांनंतरही नंबर प्लेट का नाही? हा प्रश्न प्रत्येक नागरिक विचारत आहे. यामागे नगरपरिषद, संबंधित ठेकेदार आणि आरटीओ कार्यालय यांच्यातील उदासीनता आहे की कोणाचे तरी आशीर्वाद? शहरात कायद्याला डावलून निष्काळजीपणाने धावणाऱ्या या गाड्या नेमक्या कोणाच्या संरक्षणाखाली आहेत हे शोधणे अत्यंत आवश्यक आहे. संबंधित ठेकेदाराने तात्काळ कार्यालयात गाड्यांची नोंदणी करून नंबर प्लेट बसवावी, अन्यथा नागरिक स्वतः अधिकाऱ्यांशी संपर्क साधून कायदेशीर पावले उचलणार असल्याचा इशारा व्यक्त करत आहेत.




आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणूक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


# दिवाळीत वराडकर महाविद्यालयास डॉ. अशोक कांबळे यांची भेट



**जनसंचलन/बुलडाणा**

दिवाळीच्या सुट्टीत लोक फटाके, फराळ, नवीन कपडे, नातेवाईकांच्या भेटी आणि फिरायला जाण्याचा आनंद घेतात. सुट्या साधारण आठ ते वीस दिवसांच्या असल्यामुळे अनेक लोक कुटुंबासह फिरायला जातात. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली हे सुंदर पर्यटनस्थळ असून येथे समुद्रकिनारे आणि बारा प्रेक्षणीय स्थळे आहेत. त्यामुळे पुणे आणि मुंबई येथील प्राध्यापक, शिक्षक आणि उद्योजक यांचे हे आवडते ठिकाण बनले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सावकार अभ्यासपीठाचे (चेअर) प्राध्यापक डॉ. अशोक विष्णू कांबळे हे आपल्या कुटुंबीयांसह आणि मित्रपरिवारासह दापोलीतील वराडकर महाविद्यालयाला नुकतेच भेट देण्यासाठी आले होते. डॉ. कांबळे हे यापूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य तसेच मॉर्डन महाविद्यालय, पुणे येथील लेखाशास्त्र विषयाचे प्राध्यापक आणि उपप्राचार्य म्हणून कार्यरत होते. या प्रसंगी त्यांच्यासोबत अरविंद अशोक कांबळे, सुरेखा अशोक कांबळे, अण्णासाहेब मराठे आणि जयश्री मराठे हे उपस्थित होते. त्यांच्या कुटुंबीय, मित्रपरिवार आणि नातेवाईकांनीही या भेटीत सहभाग घेतला. वराडकर बेलोसे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांनी डॉ. कांबळे यांचे पुष्पगुच्छ आणि पुस्तके भेट देऊन स्वागत केले. सुमारे चाळीस मिनिटे चाललेल्या चर्चेत राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, महाविद्यालयीन कामकाज आणि व्यवस्थापनातील अडचणी यावर सविस्तर चर्चा झाली. डॉ. भारत कऱ्हाड यांनी महाविद्यालयातील सर्व उपक्रमांची सविस्तर माहिती त्यांना दिली. ते पुढे म्हणाले, ही भेट कौटुंबिक असली तरी त्यातून चांगले मार्गदर्शन मिळाले आणि दिवस अतिशय आनंददायी गेला.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!